**ठळक बातम्या**

- भारत - अमेरिका व्यापार कराराला वर्षभराच्या चर्चेनंतर अंतिम स्वरुप दिल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांचं आज लोकसभेत निवेदन
- राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रस्तावावरच्या चर्चेला प्रधानमंत्री आज लोकसभेत उत्तर देणार
- भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची द्वैमासिक आढावा बैठक आजपासून सुरू
- ब्राझीलचे अध्यक्ष लुईझ इनासिओ लुला दा सिल्वा या महिन्यात भारत दौऱ्यावर

**आणि**

- आशियाई बॅडमिंटन सांघिक विजेतेपद स्पर्धेत भारताच्या महिला संघाची विजयी सलामी

**<><><><><>**

भारत - अमेरिका व्यापार कराराविषयी वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी आज लोकसभेत निवेदन दिलं. या करारावर दोन्ही देशांनी एक वर्ष चर्चा केली, त्यानंतर त्याला अंतिम स्वरूप दिलं गेलं. या करारात भारताला आपल्या महत्त्वाच्या क्षेत्रांचं हित साधण्यात यश आल्याचं गोयल यांनी सभागृहाला सांगितलं. कृषी, दुग्धव्यवसाय या क्षेत्रांना याचा मोठ्या प्रमाणात फायदा होईल, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी नव्या संधी निर्माण होतील असं गोयल यांनी नमूद केलं. या करारामुळे मेक इन इंडिया ही संकल्पना पूर्ण व्हायला मदत होईल, विकसित भारत २०४७ या ध्येयाकडे जाण्यासाठी हे महत्त्वाचं पाऊल आहे, असं ते म्हणाले. अमेरिकेनं भारतावर लावलेलं आयात शुल्क अठरा टक्क्यांवर आणल्यामुळे अमेरिकन बाजारपेठेकडे भारताची निर्यात वाढेल असा विश्वासही

त्यांनी व्यक्त केला. पीयूष गोयल बोलत असताना विरोधी पक्षाच्या सदस्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. या गदारोळातच गोयल यांनी आपलं निवदेन पूर्ण केलं. त्यानंतर सभापतींनी सदस्यांना शांत राहायचं आवाहन केलं मात्र गदारोळ सुरूच राहिल्यानं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरल्या आभार प्रस्तावावरल्या चर्चेला उत्तर देणार आहेत.

**<><><><><>**

वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी काल पत्रकार परिषद घेऊन भारत-अमेरिका व्यापार कराराविषयी निवेदन देणं हा संसदीय परंपरेचा भंग असल्याची टीका काँग्रेस खासदार प्रमोद तिवारी यांनी राज्यसभेत केली. अधिवेशन सुरू असताना धोरणात्मक मुद्द्यांवर सभागृ ृहाच्या बाहेर चर्चा करणं सभागृहाच्या नियमांचा भंग आहे, असं तिवारी म्हणाले. राज्यसभा अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांनी तिवारी यांचा प्रस्ताव फेटाळून लावला.

त्याआधी सकाळी सभागृहाचं कामकाज सुरू झाल्यावर सभापती ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला. त्याचवेळी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी विविध मुद्दे उपस्थित करत घोषणाबाजी सुरू केली. केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण राज्यमंत्री निंबुबेन बांभनिया यांनी या गदारोळातच उत्तर देण्याचा प्रयत्न केला. मात्र गदारोळ वाढत गेल्यानंतर कामकाज बारा वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. राज्यसभेत भाजपा खासदार समिक भट्टाचार्य यांनी पश्चिम बंगाल राज्य सरकार केंद्र सरकारच्या योजना राज्यात राबवण्यात अपयशी ठरल्याचा आरोप केला.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सहा दिवसांच्या ओदिशा दौऱ्यावर असून आज सकाळी पुरी इथल्या जगन्नाथ मंदिरात त्यांनी विधीवत पूजा केली. महुलदिही इथल्या

सरकारी शाळेच्या अमृत महोत्सवानिमित्त आज आयोजित कार्यक्रमात राष्ट्रपती सहभागी होणार असून त्या विद्यार्थ्यांशी तसंच शिक्षकांशी संवाद साधणार आहेत. शाळेत उभारलेल्या आदिवासी नेते भंजबीर सनाराम सोरेन यांच्या पुतळ्याचं अनावरण त्या करणार आहेत. या दौऱ्यात राष्ट्रपतींच्या हस्ते विविध विकास कामांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली जाणार आहे. तसंच त्यांच्या सभा देखील होणार आहेत.

**<><><><>**

परीक्षा पे चर्चा हा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा विद्यार्थ्यांशी संवादाचा कार्यक्रम येत्या शुक्रवारी सकाळी १० वाजता प्रसारित होणार आहे. तणावमुक्त वातावरणात परीक्षा देण्याचं महत्त्व तसंच मनाची शांतता, आत्मविश्वास वाढवणं आणि आव्हानांवर मात करणं यासाठीचे उपाय याविषयी प्रधानमंत्री विद्यार्थ्यांशी बोलले आहेत. यावर्षी देवमोगरा, कोइमतूर, रायपूर, गुवाहाटी आणि नवी दिल्लीतल्या परीक्षार्थी विद्यार्थ्यांसोबत चर्चा केल्याची माहिती प्रधानमंत्र्यांनी दिली आहे.

**<><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची तीन दिवसांची बैठक आजपासून सुरू झाली. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या नेतृत्वाखाली सहा सदस्यांची पत आणि वित्त धोरण समिती येत्या शुक्रवारी द्वैमासिक आढावा जाहीर करेल. रिझर्व बँकेनं गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात रेपो दरात कपात करुन तो सव्वा पाच टक्के केला होता.

**<><><><>**

ब्राझीलचे अध्यक्ष लुईझ इनासिओ लुला दा सिल्वा या महिन्यात भारत दौऱ्यावर येणार आहेत. जागतिक पातळीवर वेगानं बदलणाऱ्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सिल्वा यांच्या दौऱ्यामुळे भारत आणि ब्राझील देशांमधील संबंध अधिक दृढ होणार आहेत. उभय देशांत व्यापार, तंत्रज्ञान आणि भू राजकीय क्षेत्रांत वाढणारा

समन्वय अत्यंत महत्त्वाचा असल्याचं ब्राझीलचे भारतातले राजदूत केनेथ एच. दा नोब्रेगा यांनी वृत्तसंस्थांना दिलेल्या मुलाखतीत सांगितलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ब्राझील दौऱ्याला एक वर्ष पूर्ण होण्याआधीच राष्ट्राध्यक्ष सिल्वा भारत भेटीवर येत असल्यानं या दौऱ्याला विशेष महत्त्व आहे.

**<><><><><>**

भारत आणि केनिया देशातल्या द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेणारी बैठक आज केनियाची राजधानी नैरोबी इथं झाली. या बैठकीत क्षेत्रीय आणि जागतिक पातळीवरील महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयातले पूर्व आणि दक्षिण आफ्रिकन देशांसाठीचे संयुक्त सचिव जनेश काइन आणि केनियाच्या परराष्ट्र -प्रवासी व्यवहार मंत्रालयातील आशिया आणि पॅसिफिक विभागाच्या उपमहासंचालक जेन माकोरी या बैठकीत सहभागी झाले होते.

व्यापार आणि गुंतवणूक, संरक्षण, सुरक्षा, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, शिक्षण, संस्कृती, क्षमता-विकास आणि पर्यटन क्षेत्रांत असलेले द्विपक्षीय सहकार्य अधिक मजबूत करण्यासाठी दोन्ही देश वचनबद्ध आहेत, अशी माहिती नैरोबी इथल्या भारतीय उच्चायोगाने दिली.

**<><><><><>**

NEET - PG २०२५-२६ साठीचं कट ऑफ पर्सेन्टाईल्स कमी करण्याच्या वैद्यकीय विज्ञान राष्ट्रीय परीक्षा मंडळाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने सरकारकडून उत्तर मागवलं आहे. या प्रकरणी न्यायाधीश न्यायमूर्ती पी. एस नरसिंहा आणि आलोक आराधे यांच्या खंडपीठाने केंद्र सरकार, एन बी ई एम एस , राष्ट्रीय वैद्यकीय आयोग आणि इतरांना नोटीस बजावली आहे. या प्रकऱणी पुढची सुनावणी ६ फेब्रुवारीला होणार आहे. देशभरात १८ हजारांहून अधिक वैद्यकीय पदव्युत्तर जागा रिक्त राहिल्याने नीट

पीजी २०२५ च्या प्रवेशासाठी पर्सेन्टाइल ४० वरून शून्य करण्याचा निर्णय एन बी ई एम एसने घेतला आहे.

<><><><><>

आज जागतिक कर्करोग दिवस. जनसामान्यांमध्ये कर्करोगाबद्दल जागरुकता वाढावी आणि त्याला प्रतिबंध करण्यासाठी कशी काळजी घ्यावी, या आजाराचं लवकर निदान आणि उपचारांबाबत जागरुकता निर्माण व्हावी, यासाठी दरवर्षी ४ फेब्रुवारीला दिवस पाळला जातो. 'युनायटेड बाय युनिक' अशी यंदाच्या जागतिक कर्करोग दिनाची संकल्पना आहे.

नुकत्याच सादर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात देशातल्या सर्व जिल्ह्यात कॅन्सर डे केअर युनिटची स्थापना आणि कर्करोगाच्या औषधांवरचं सीमा शुल्क माफ करण्याचा निर्णय जाहीर झाला. या निर्णयामुळे रुग्णांना मोठा दिलासा मिळाणार असल्याचं आरोग्य आणि कुटुंब कल्याणमंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.कर्करोगातून बरे झालेल्या रुग्णांना पाठिंबा देण्याचा आणि निरोगी समाजासाठी नियमित तपासणीबाबत जागरुकता निर्माण करणारा हा दिवस असल्याचं नड्डा यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

उद्योगपती अनिल अंबानी यांच्या मालकीच्या कंपन्यांशी संबंधित फसवणुकीच्या प्रकरणांची चौकशी वेगाने करावी असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने आज सीबीआय आणि ईडीला दिले. अनिल अंबानी यांच्या अनेक कंपन्यांमध्ये सार्वजनिक निधीचा गैरवापर, आर्थिक विवरणांमध्ये फेरफार केल्याचा आरोप करणाऱ्या जनहित याचिकेवर आज सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल पांचोली यांच्या पीठासमोर सुनावणी झाली.

<><><><><>

आशियाई बॅडमिंटन सांघिक विजेतेपद स्पर्धेत भारताच्या महिला संघाने म्यानमाचा ५ विरुद्ध शून्य अशा गुणफरकाने पराभव करुन विजयी सलामी दिली. चीनमधे क्विंगडो इथं सुरु असलेल्या या स्पर्धेत तन्वी शर्माने ठेट हतार ठुझार हिचा २१-१२, २१ -१६ असा पराभव केला.

//<><><><><>//